CMYK

शनिवार
२५.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २८९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१




# शरणागती आधी 'आका' बीडमध्येच?

## सीसीटीव्ही व्हायरल होतात,पण तपास यंत्रणांपर्यंत का पोहोचत नाही?

बीड, (प्रतिनिधी) :- वाल्मिक कराड प्रकरणात पुन्हा नवे सीसीटीव्ही फुटेज, पुन्हा नवे दावे, पुन्हा नवे आरोप... हा प्रकार अजूनही सुरुच आहे. आताही एक सीसीटीव्ही व्हायरल होत असून त्यामध्ये वाल्मिक कराडच्या ताफ्यातील गाड्या या बीडवरून पुण्याच्या दिशेने जाताना दिसत आहेत. त्यावरून ३१ डिसेंबर रोजी पुण्यात सीआयडी कार्यालयात शरण येण्यापूर्वी वाल्मिक कराड हा बीडमध्येच होता का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सीसीटीव्ही व्हिडीओ माध्यमांच्या हाती लागतात पण तपास यंत्रणांपर्यंत का पोहोचत नाही? असा प्रश्न संतोष देशमुखांच्या बंधुंनी उपस्थित केला. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तर या संदर्भात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना पत्र लिहिलं. ऑफिस ऑफ



प्रॉफिटमुळे धनंजय मुंडेंचं मंत्रीपदच नव्हे तर आमदारकी सुद्धा धोक्यात असल्याचं भाकीत त्यांनी केलं. वाल्मिक कराडला खंडणी प्रकरणात न्यायलयीन कोठडी झाल्यानंतर वकिलाने केज जिल्हा सत्र न्यायालयामध्ये जामीन अर्ज दिला होता. जामीन अर्जावरील सुनावणी दोनदा लांबणीवर गेली होती. अखेर तो जामीन अर्ज कराडच्या वकीलांनी बिनशर्त मागे घेतला. वाल्मिक कराडला रात्री पोटदुखीचा त्रास सुरु झाला आणि अस्वस्थ वाटू लागल्याने जिल्हा सरकारी रुग्णालयात ऍडमिट करण्यात आलं. दरम्यान, वाल्मिक कराड प्रकरणात रोज नवनवे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल होणं आणि त्या आधारे नवनवे दावे पुढे येणं सुरुच आहे. अनेक दिवस गायब असलेला वाल्मिक कराड ३१ डिसेंबरला पुण्यात सीआयडीला शरण आला होता. मात्र तो ३० डिसेंबरला बीडवरून पुण्याला गेला होता का असा प्रश्न विचारला जातोय. याचं कारण म्हणजे ३० डिसेंबरच्या रात्रीचं सोलापूर-धुळे महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेज. ज्यात ▶▶पान २ वर

### धनंजय मुंडेंची आमदारकी धोक्यात,अंजली दमानियांचा दावा

संतोष देशमुख हत्या प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना पत्र लिहिलं. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्यायालयाने हस्तक्षेप करावा, धनंजय मुंडेवरील आरोपांच्या चौकशीचे आदेश न्यायालयाने द्यावेत अशी मागणी त्यात केली आहे. तसंच लाभाच्या पदामुळे धनंजय मुंडेंची आमदारकी सुद्धा धोक्यात आल्याचा दावा त्यांनी केला. वाल्मिक कराडच्या दवाखान्यात दाखल होण्यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. अंजली दमानिया म्हणाल्या की, ''महाजेनकोकडून धनंजय मुंडे यांच्या कंपनीला थेट फायदा झाला आहे. आमदार किंवा खासदार अशा ▶▶पान २ वर



### राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू होणार

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष

मुंबई, (वृत्तसेवा):-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील गरजू रूग्णांना अत्यावश्यक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी, आर्थिक सहाय्य देण्याकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत आहे. या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. नागरिकांना या सेवा त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात ''मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष'' सुरु करण्यात येणार आहे. याबाबत शासननिर्णय २२ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे नागरीकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे. यामुळे नागरिकांना वेळ व पैशाचा अपव्यय टाळता येईल. यासह मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक सुलभ ▶▶पान २ वर




# दिंद्रुडच्या तरुणाच्या पुण्यातील हत्येचा उलगडा

## पुण्यात अल्पवयीन प्रेयसीच्या आईकडून तरुणाची हत्या

बीड, (प्रतिनिधी):-दिंद्रूड येथील तरुण बालाजी (बाळसाहेब) मंचक लांडे याची पुण्यात हत्या झाली होती. तपासात ही हत्या बालाजीचे अल्पवयीन मुलीशी असलेल्या प्रेमसंबंधातून झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मुलीच्या आईने तरुणाला पुणे येथे बोलावून घेतले आणि मित्रांच्या मदतीने त्याची हत्या केली. या प्रकरणात मुलीची आई रेखा भातनासे, रिक्षाचालक दिनेश सूर्यकांत उपादे, आदित्य शरद शिंदे यांना अटक केली.तसेच इतर तीन आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध पोलीस घेत आहेत. मृत बालाजी सावत्र आईसोबत राहत होता. १५ वर्षांपूर्वी त्याच्या वडिलांनी आत्महत्या केली होती. त्याही अगोदर त्याची सख्खी आई त्याला सोडून माहेरी गेली होती. सावत्र आई सरस्वती यांनीच त्याला सांभाळले. सरस्वती लांडे म्हणाल्या, ३ वर्षांपासून रेखा भातनासे बालाजीला माझ्या मुलीसोबत लग्न लावून देते असे सांगत होती. त्याला कंपनीत काम करायला लावून पगार ती घेत होती. ६ महिन्यांपासून तो दिंद्रूडला आल्याने तिला पैसे मिळत नव्हते, म्हणून तिने बालाजीला पुण्याला बोलावून घेत खून केला. माझी म्हातारपणाची काठी कायमची हरवली, असे त्या म्हणाल्या.



# क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांचा २ दिवसीय बीड जिल्हा दौरा

बीड, (प्रतिनिधी):- राज्याचे क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते रविवार दि. २६ जानेवारी २०२५ रोजी मुख्य ध्वजारोहण सोहळा होणार आहे. यानिमित्त ते २ दिवसाच्या बीड जिल्हा दौ-यावर येत आहेत. त्यांचा नियेजित दौरा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे. शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ सायंकाळी ७ वाजता शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर रोड बीड येथे आगमन व राखीव. सायंकाळी ८ वाजता लोटस मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल बीड येथे सदीच्छा भेट. स्थळ लोटस्? मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल श्री. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह मार्ग बीड, संपर्क डॉ. अमित काळे ▶▶पान २ वर



# वाल्मिकला जेलमध्ये पाठवलं,आता पोरांचा नंबर

### सुरेश धस यांचे कराडच्या मुलांवर गंभीर आरोप,ते १५० कॉल कुणाचे?



बीड, (प्रतिनिधी) :-महादेव मुंडे खून प्रकरणात वाल्मीक कराड यांचे मुले सुशील कराड आणि श्री कराड यांनी पोलीस अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना दीडशे कॉल केले, असा सनसनाटी आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला. सुरेश धस यांनी महादेव मुंडे यांच्या हत्येच्या संदर्भाने निवेदन देण्यासाठी बीड पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. या भेटीत स्थानिक गुन्हे शाखेकडे महादेव मुंडे यांच्या हत्येचा तपास देण्याचे बीडच्या पोलीस अधीक्षकांनी मान्य केल्याचे धस यांनी सांगितले. महादेव मुंडे यांची हत्या २२ ऑक्टोबर २०२३ रोजी झाली. घटनेला वर्ष दीड वर्ष उलटूनही कुटुंबाला अजूनही न्याय मिळत नाही. पोलीस तपास करीत नाहीत, आरोपी मोकाट आहेत. अशा सगळ्या पार्श्वभूमीवर धस यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. महादेव मुंडे खून प्रकरणात वाल्मीक कराड यांचे मुले सुशील कराड आणि श्री कराड यांनी पोलीस अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना दीडशे कॉल केले आहेत. त्यांचे फोन कॉल पडताळण्यात आलेले आहेत. या हत्या प्रकरणाचा तपास ▶▶पान २ वर

### जशी मुन्नी बदनाम तसे पोलीसही बदनाम झालेत

तसेच पीआय बल्लाळ आणि सुरेश धस यांच्या व्हायरल ऑडिओ कॉलवर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना धस म्हणाले, ''जशी मुन्नी बदनाम तसे बीडचे पोलीसही बदनाम झाले आहेत. त्याला अटक झालेली असतानाही वाल्मिक कराड गाडीत बसत असताना रोहित कुठे असे तो विचारतो आणि मिस्टर बल्लाळ त्यांना आवाज देतात अरे बापरे बीडच्या पोलीस दलात हे काय चाललंय?''

# बिंदुसरा नदीपात्रात अतिक्रमित बांधकाम

## कचऱ्याचे ढीग आता सर्रास वृक्षतोड ; नगरपालिकेचे दुर्लक्ष-डॉ.गणेश ढवळे

बीड, (प्रतिनिधी):- बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीमध्ये मागील काही वर्षापासून नदीपात्रामध्ये भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन याला नगरपरिषद व जिल्हा प्रशासनाचा छुपा पाठिंबा दिसुन येत आहे. नदीपात्रामध्ये कचऱ्यांचे भर टाकून त्यावर प्लॉटिंग करणे ,रस्ते बनवणे , बांधकाम करणे असे प्रकार सर्रास आढळून येत आहेत .आता यातच काही मंडळींनी नदीपात्रातील महाकाय वृक्षांची कत्तल करण्यास सुरुवात केली असून याकडे नगर प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि वनविभाग सोयीस्करपणे डोळेझाक करत आर्थिक हितसंबंध जोपासत दुर्लक्ष करताना दिसते. संबंधित अतिक्रमण आणि बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, शेख युनुस, शिवशर्मा शेलार, मुबीन शेख, बीड जिल्हाध्यक्ष आप, अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष (इंटक) रामधन जमाले यांनी उपमुख्याधिकारी, नगरपरिषद बीड सम्राट कदम यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. बीड शहरातील बिंदुसरा नदी पात्रातील ब्लड झोन, ग्रीन झोन, रेड झोन, येल्लो झोन असे विविध झोन नगरपालिका डायरीतून गायब



### पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्कप्रमुखपदी


# वैभव स्वामी यांची निवड



बीड, (प्रतिनिधी):-महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांचे संघटन कौशल्य, उपक्रमशीलता लक्षात घेऊन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री संजयजी भोकरे साहेब यांच्या सूचनेनुसार पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी वैभव विवेक स्वामी यांची निवड केली असल्याबाबत प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे मागील दहा वर्षापासून बीड जिल्हाध्यक्ष त्याचबरोबर मागील पाच वर्षापासून मराठवाडा विभागीय अध्यक्ष पद सांभाळत ▶▶पान २ वर

### राजेभाऊ फड यांची यशस्वी मध्यस्थी

# विजय बडे यांचे उपोषण मागे!



परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):-परळी तालुक्यातील मौजे रेवली येथील विजय बडे व त्यांचे सहकारी यांनी विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या आज पाचव्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी उपोषणस्थळी भेट दिली. पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजीराव मुंडे आणि पंचायत समितीच्या प्रशासनाशी उपोषणकर्ते विजय बडे यांची चर्चा घडवून आणण्यात आली. त्यांनी केलेल्या ▶▶पान २ वर

# तब्बल २२ वर्षानंतर जवळा हायस्कूल जवळा (म्हाळस) येथे भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा!

बीड, (प्रतिनिधी):- आचार्य विनोबा भावे शिक्षण प्रसारक मंडळाच्या 'जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय' जवळा (म्हाळस) चा दि.२३ जानेवारी गुरुवार रोजी तब्बल २२ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा अतिशय उत्साही व आनंदी वातावरणामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव युवराज राजेंद्र जगताप, कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा.भगवानराव गव्हाणे, प्रमुख उपस्थिती मध्ये शाळेतील सर्व सेवानिवृत्त शिक्षक व कार्यरत शिक्षक हे होते. या कार्यक्रमात प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी या दिवसाचा मनसोक्त आनंद घेतला. आपल्या जुन्या सवंगड्यांना भेटून अतिशय आनंद



वाटला. प्रत्येकाने आपल्या जीवनातील सुख-दुःख व जुन्या आठवणींना, व शालेय शिक्षण घेत असताना केलेला अभ्यास, गुरुजींचा खाल्लेला मार, तसेच मित्रांसोबतची मौजमस्ती इत्यादी आठवणींना पुन्हा उजाळा दिला. अनेक मित्रांनी आपल्या मनोगतातून शाळेविषयी, शाळेच्या शिक्षकांविषयी आपला आदर व स्नेह व्यक्त केला. बॅचेसच्या वेळेचे विद्यार्थी खूप अभ्यासू, मेहनती खोडकर, दंगामस्ती करणारे तसेच शिक्षकांचा आदरही राखणारे होते हेच निष्पन्न झाले. कार्यक्रमांमध्ये दाळ- बाटी या जेवणच्या बेता मुळे सर्व विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी खुश झाले. सर्वांनी अगदी मनसोक्त डाळ-बाटी वरती ताव मारला. जेवणानंतर माजी विद्यार्थ्यांचा ऑफिस शेजारील इयत्ता दहावी (ब) च्या वर्ग खोलीमध्ये वर्ग भरवण्यात आला. या वर्गामध्ये प्रथम मिसाळ सर, डोंगरदिवे सर, मोटे मॅडम, शेळके सर, आंदुरे मॅडम यांनी प्रवेश करताच सर्व विद्यार्थ्यांनी एका सुरात 'एक साथ नमस्ते' अशी घोषणा दिली. त्यानंतर डोंगरदिवे सरांनी इंग्लिशचा दहा मिनिटे ▶▶पान २ वर



# वॉशिंग्टनची कुऱ्हाड!



अमेरिकेचे नवे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सत्तारोहणाचे थेट प्रक्षेपण पाहताना नक्की कोणकोणत्या भावना दाटून आल्या याचे वर्णन करता येणे अशक्य. अमेरिकी जनतेविषयी कमालीची कणव, निखळ विनोदाचा जागतिक नमुना पाहत असल्याचा निर्भेळ आनंद, पोट धरधरून हसणे, काही विधानांमुळे पुन:प्रत्ययाचा आनंद इत्यादी इत्यादी विविध भावतरंग हा सोहळा पाहत असताना सातत्याने उमटले. त्यांची ''अमेरिकेचा ऱ्हास आजपासून थांबणार'', ''अमेरिकी जनता आजपासून खरी स्वतंत्र होणार'', ''अमेरिकेच्या सुवर्णयुगास आजपासून सुरुवात'' आदी विधाने बहुसंख्यांस प्रतिध्वनीसम भासली असणार तर त्या विधानांमुळे काही अल्पसंख्यांच्या कपाळावरील आठ्यांची संख्या वाढली असणार. जे कोणी बहुसंख्य वा अल्पसंख्य या दोहोंत नसतील, त्यांच्या मनात हे सारे याआधी कोठे बरे ऐकले असा प्रश्न निर्माण झाला असणार आणि आपण अमेरिका या एकमेव महासत्ता प्रमुखाचे सत्तारोहण पाहत आहोत की टिंबक्टु देशाच्या प्रमुखाचे असाही प्रश्न त्यांस पडला असणार. एकाच वेळी विनोद आणि करुणा, उपहास आणि उद्वेग अशा परस्परविरोधी भावना जागृत करण्याची या सोहळ्याची– आणि या समारंभाचे नायक ट्रम्प यांची– क्षमता वादातीत म्हणायला हवी. त्यांचा दुसऱ्या खेपेचा चार वर्षांचा सत्ताकाळ या सोहळ्याने सुरू झाला. त्यामुळे आगामी काळात त्यांच्या या गुणांचा प्रत्यय आपणास येणार असल्याने त्याविषयी अधिक काही भाष्य न करता त्यांनी सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर जे काही निर्णय घेतले त्यांची दखल घेतलेली बरी. मेक्सिकोच्या आखाताचे 'अमेरिकेचे आखात' असे नामकरण, पनामा कालवा पुन्हा अमेरिकेच्या ताब्यात घेणे, पर्यावरणाशी संबंधित पॅरिस करारातून अमेरिकेने बाहेर पडणे, अमेरिकी तेल कंपन्यांना हवे तितके तेल उपसू देण्याची मुभा असणे, जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्यत्वाचा त्याग करणे, मेक्सिको–अमेरिका सीमेवर आणीबाणी जाहीर करून तेथील व्यवस्था संरक्षण दलाच्या हाती देणे अशा एकापेक्षा एक निर्णयांचा ट्रम्प यांचा धडाका यानिमित्ताने जगाने अनुभवला. अलीकडे 'ढ' व्यक्तींच्या वाटेल त्या कृत्यांस धडाडी म्हणण्याची प्रथा पडली असून ती चांगल्या प्रकारे रुजलेली दिसते. ट्रम्प यांचा पहिल्याच दिवसातील हा निर्णयधडाका धडाडी या गुणाविषयी खचितच प्रश्न निर्माण करतो. हे इतकेच नाही. यापुढे अमेरिकेत 'पुरुष' आणि 'स्त्री' हा पारंपरिक भेदच फक्त अधिकृत मानला जाईल. म्हणजे पारलिंगी (एलजीबीटीक्यू) व्यक्तींस त्या देशात यापुढे काहीही स्थान राहणार नाही. जन्माला आलेल्या प्रत्येक जिवाने पुरुष तरी असायला हवे अथवा स्त्री. हे दोन्हीही नसलेले वा दोन्हीही असलेल्यांस अन्यत्र 'चले जाव' असा ट्रम्प यांचा आदेश असेल. गेल्या निवडणुकीत डेमोक्रेटिक पक्षाच्या जो बायडेन यांनी ट्रम्प यांचा पराभव केला. तो निकाल जितका राजकीय होता त्यापेक्षा ट्रम्प यांच्यासाठी पुरुषार्थास हात घालणारा होता. त्यानंतर ट्रम्प यांचे समर्थक 'कॅपिटॉल हिल'वर चालून आले आणि त्यांना ट्रम्प यांची फूस होती. अशा दीड हजार दंगेखोरांस त्या वेळी सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतले आणि त्यांच्यावर खटले भरले. त्या सर्वांस ट्रम्प यांनी पहिल्याच दिवशी माफी दिली. म्हणजे सरकारविरोधातील बंडदेखील आता अमेरिकेत शिक्षापात्र नाही. यातील काही निर्णयांची घोषणा तातडीने झाली असली तरी त्यांचे परिणाम दूरगामी असतील. उदाहरणार्थ वसुंधरा रक्षणाच्या पॅरिस करारातून तसेच जागतिक आरोग्य संघटनेतून अमेरिकेने बाहेर पडणे. पर्यावरणाच्या मुद्द्यावर आधीच विकसित आणि विकसनशील देशांत मोठी दरी आहे. पर्यावरण रक्षणार्थ विकसनशील देशांनी उपाय योजायचे पण त्याबदल्यात विकसित देशांनी त्या खर्चाचा भार उचलण्यास नकार द्यायचा असा हा वाद. पर्यावरणाचा इतका ऱ्हास झालेला आहे तो विकसित देशांच्या आतापर्यंतच्या धोरणांमुळे. पण पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उपायांमुळे पोटास चिमटा बसणार तो विकसनशील देशांच्या असा हा व्यापार. आता तर या सगळ्याच जबाबदारीतून अमेरिका स्वत:स मुक्त करणार. म्हणजे पॅरिस करार जवळपास बोंबलला असे म्हणायचे. त्यात हा गृहस्थ अमेरिकी तेल कंपन्यांस हव्या तितक्या तेल विहिरी खणा असे म्हणतो. इतकेच नाही तर आतापर्यंत सर्व प्रकारच्या पर्यावरणीय धोक्यांपासून दूर ठेवल्या गेलेल्या अलास्का प्रांतातही तेल उत्खननादी व्यवहार सुरू करणार असे म्हणतो, म्हणजे सगळाच आनंद. तीच बाब आरोग्य संघटनेबाबत. ट्रम्प अत्यंत विज्ञानद्वेषी आहेत. करोनाकाळात जगाने त्याचा अनुभव घेतला. माणसे त्या काळात औषधोपचारांअभावी मरत असतानाही त्यांचा करोना लशीस विरोध होता. या संकटसमयी आपली मते आपल्यापाशी ठेवावीत, इतका पोच त्यांस नाही. त्यामुळे त्यांनी लशींस असलेला विरोध व्यक्त केला. त्या काळात जागतिक आरोग्य संघटना सक्रिय होती आणि अमेरिकेची डॉ. अँथनी फौची यांच्यासारखी व्यक्ती साथ नियंत्रणात आघाडीवर होती. आता अमेरिका या संघटनेतूनच बाहेर पडणार आहे. याच गतीने ट्रम्प कारभार करत राहिले तर उद्या हा इसम 'संयुक्त राष्ट्रा'तून अमेरिकेस वेगळे करण्यास कमी करणार नाही. या संघटनेचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे आहे. न जाणो तेही येथून हलवा असे ते म्हणणारच नाहीत, याची खात्री नाही. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्या घेतल्या ट्रम्प यांनी स्थलांतरितांवर लगेच आसूड चालवायला सुरुवात केली. हे स्थलांतरित हा त्यांचा मोठाच रागाचा विषय. या मुद्द्यावरही ट्रम्प यांची तळी उचलणारे आपल्याकडेही मोठ्या संख्येने आहेत. या आसूडाचे वळ आपल्या पाठीवर उमटत नाहीत तोपर्यंत अशा उपायांचे स्वागत केले जाते. या ट्रम्प स्वागतोत्सुकांस हे माहीत नसेल की कोणतेही अधिकृत परवाने नसताना अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या भारतमातेच्या सुपुत्रांची संख्या जवळपास ७.५ लाख इतकी आहे. यातील अनेकांस ट्रम्प यांचा बडगा बसून पुन्हा स्वदेशसेवेस यावे लागेल. इतकेच नाही, तर ट्रम्प यांनी सरकारवर नवीन नेमणूक बंदी जारी केली. याचा अर्थ अमेरिकेत नव्या नोकऱ्या आता तितक्या संख्येने मिळणार नाहीत आणि ज्यांना त्या मिळालेल्या आहेत, त्यांच्या त्या राहतीलच याची हमी नाही. आपले अनेक तरुण अभियंते/ कुशल कामगार/ कारकून इत्यादी अमेरिकेत स्थानिकांपेक्षा कमी वेतनात काम करतात. स्थानिकांच्या दृष्टिकोनातून या गुणवान मजुरांकडे पाहू गेल्यास त्यांचे वर्णन 'भय्ये' असेच करावे लागेल. येथील एके काळच्या शिवसेना वा नंतरच्या मनसेप्रमाणे ट्रम्प त्या देशातील सर्व भय्यांस हाकलून लावू इच्छितात. तशी त्यांनी सुरुवातही केली असून मेक्सिको देशीयांवर हा पहिला बडगा उचलला गेला आहे. भारतीयांचा क्रम कधी ते आता पाहायचे. येथे ट्रम्प यांच्या विजयाने उचंबळणारे समाजमाध्यमी अर्धवटराव त्यांनी भारतीय अभियंत्यांवर कारवाई सुरू केल्यानंतरही ट्रम्प यांच्याविषयी तीच कृतकृत्यतेची भावना दर्शवतील, ही आशा. भारत हा परदेशी उत्पादनांवर कर आकारण्यात आघाडीवर आहे, अशी टीका त्यांनी केलेली आहेच. त्यातून भारतीय उत्पादनांवरही ते आता तितकेच कर आकारणार याचा अंदाज येतो. हे झाले त्यांच्या निर्णयाविषयी. बाकी त्यांचा सत्ताग्रहण सोहळा दिव्यच होता म्हणायचे. ट्रम्प यांचे गुणगान करताना एका ख्रिश्चन धर्मगुरूच्या अंगात आल्यासारखेच झाले. त्याने घागर फुंकली नाही, इतकेच. ''परमेश्वराने मला अमेरिका महान करण्यासाठी वाचवले'' अशा अर्थाचे विधान ट्रम्प यांनी केले आणि त्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला. ते दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे खरेच. ट्रम्प यांस 'वॉशिंग्टनची कुऱ्हाड' ही कथा माहीत आहे किंवा काय हे कळावयास मार्ग नाही. काहीही असो. ट्रम्प स्वत:च ही कुऱ्हाड बनणार हे निश्चित.

# एसटी प्रवास महागला

## महिलांना ५० टक्के सवलत मिळणार की नाही?

मुंबई, (वृत्तसेवा):–विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता राज्य सरकार लाडक्या बहिणींच्या अर्जाची छाननी करत आहे. त्यातील अपात्र असणाऱ्या बहिणींना योजनेअंतर्गत मिळणारी रक्कम देणार नसल्याचं म्हटलं जात आहे. अशात आता परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महिलांना एसटी बस प्रवासात महिला सन्मान योजनेअंतर्गत मिळणाऱ्या ५० टक्के सवलतीबाबत प्रतिक्रिया दिली आहे. राज्यात २४ जानेवारीपासून जवळपास १५ टक्क्यांनी एसटी प्रवास महागला आहे. त्यानंतर परिवहन मंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधताना विविध प्रश्नांची उत्तरं दिली. परिवहन मंत्र्यांनी ५० टक्के सवलतीबाबत काय म्हटलं? ही योजना सुरु राहणार की नाही? हे जाणून घेऊयात. ''राज्याचे प्रधान सचिव संजय सेठी यांच्याशी चर्चा केली. गुरुवारी मंत्रालयात प्रधान सचिवांच्या माध्यमातून परिवहन विभागाचे प्रमुख आणि एडीजी यांच्यात प्राधिनिकरणाची बैठक झाली. त्या बैठकीत एसटीच्या रखडलेल्या भाडेवाढीबाबत निर्णय घेतला. त्यानुसार बैठकीत १४.९५ टक्क्यांनी एसटी




तिकीट दरात भाडेवाढ केली. तसेच १ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ होणार आहे. मात्र याबाबत माझ्याकडे अधिकृतरित्या याबाबतची फाईल माझ्याकडे आलेली नाही, मात्र ती येईल असं मला वाटतंय '', असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटलं. ''एसटीची भाडेवाढ दरवर्षी करणं गरजेचं आहे. प्रवाशांना सुखसोयी देत असताना डीझेल–सीएनजीचा दर दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे पगार वाढले आहेत. एसटी महामंडळाची परिस्थितीत बघितली तर दरदिवशी सुमारे ३ तर दर महिन्याला ९० कोटी रुपयांचा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे भाडेवाढीशिवाय पर्याय नाही, त्यामुळे हा निर्णय घेतला गेला आहे'', असं परिवहन मंत्र्यांनी स्पष्ट केलं. ''आमच्या सरकारने ज्या जुन्या सवलती आणि योजना सुरु केल्या आहेत, त्यामध्ये कुठेही कटोती होणार नाही. सर्वसामान्य आमच्या लाडक्या बहिणींना देण्यात आलेली ५० टक्के सूट ही कायम राहिल. या सवलतीमुळेच एसटीचं उत्पन्न वाढलं आहे. त्यामुळे कोणत्याही योजनेत कटोती होणार नाही'', असं परिवहन मंत्र्यांनी स्पष्ट केलं. एसटी तिकीट दरात वाढ झाल्याने प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. या भाडेवाढीमुळे प्रवाशांना आता खिसा हलका करावा लागणार आहे.एका बाजूला दरवाढ केली जात आहे, मात्र सुविधांच्या नावाने बोंब असल्याचं प्रवाशांकडून म्हटलं जात आहे. भाडेवाढीनुसार प्रवाशांना सुविधा द्यावी. तसेच सुस्थितीत असलेल्या बसेस सोडव्यात, अशी मागणीही प्रवाशांकडून या निमित्ताने केली जात आहे.

## बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्याबद्दल...

# मा.ना अजित पवार यांचे राजकिशोर मोदी यांनी केले अभिनंदन

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद (पालकत्व) स्वीकारल्या बद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना अजित पवार यांना त्यांच्या मुंबई येथील कार्यालयात भेटून त्यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी राजकिशोर मोदी यांच्यासमवेत कापूस पणन महासंघाचे संचालक ऍड विष्णुपंत सोळंके , अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी हे उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना अजित पवार यांच्या मुंबई येथील कार्यालयात त्यांची राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी भेट घेतली. या भेटीत त्यांनी बीड जिल्ह्याचे (पालकमंत्री पद ) पालकत्व स्वीकारल्या बद्दल ना. अजित पवार यांचे बीड जिल्हा तथा अंबाजोगाई वासीयांच्या वतीने अभिनंदन केले. या भेटीदरम्यान अजित पवार व राजकिशोर मोदी यांच्यात बीड जिल्ह्यातील



विविध विषयांवर चर्चा झाली. त्याचबरोबर अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी आवश्यक अशा सर्व विषयावर देखील चर्चा करण्यात आली. राजकिशोर मोदी व ना. अजित पवार यांच्या भेटीदरम्यान अजित पवार यांनी राजकिशोर मोदी हे मागील अनेक वर्षापासून करत असलेल्या राजकिय, सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक तसेच बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचे कौतुक केले. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व पक्षाची ध्येयधोरणे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न करावा अशा सूचना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने अजित पवार यांनी राजकिशोर मोदी यांना दिल्या. राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने ना. अजित पवार यांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष वाढीसाठी आपण सदैव प्रयत्न करू असे अभिवचन राजकिशोर मोदी यांनी ना. अजित पवार यांना याप्रसंगी दिले.

पान १ वरून

### शरणागती आधी...

कराडच्या ताफ्यातील तीन गाड्या दिसत आहेत. हा ताफा बीडच्या मांजरसुंबा येथे एका हॉटेलवर जेवणासाठी थांबला. तसेच एका पेट्रोल पंपावर गाडीत डिझेल भरताना दिसत आहे. पुण्यात सीआयडी ऑफिसला शरण येताना ज्या गाडीतून वाल्मीक कराड आला ती गाडी याच ताफ्यातील होती असं सांगितलं जातंय. या सगळ्यावर धनंजय देखमुखांनी तपास यंत्रणांच्या तपासावर संशय व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, ''सीसीटीव्ही व्हिडीओ माध्यमांना भेटतात, मग यंत्रणा त्यांच्यापर्यंत का पोहोचत नाही? आमचा विश्वासघात झाला तर याला जबाबदार कोण याचे उत्तर आम्हाला हवे आहे. यंत्रणेने आतापर्यंत काय काय हस्तगत केले याची माहिती देशमुख कुटुंबाला दिली पाहिजे.*''विरोधकांचं पुढचं टार्गेट, मुंडेंचे मंत्रिपद : संतोष देशमुख हत्या प्रकरणातील एक आरोपी फरार आहे बाकी सगळे अटकेत आहेत. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडसुद्धा जेलमध्ये आहे आणि त्या सर्वांना मकोका लावलेला आहे. धनंजय मुंडेंना पालकमंत्रीपदसुद्धा नाकारण्यात आलं आहे. एसआयटी, सीआयडी, न्याय यंत्रणा आपल्या गतीने पुढे जात आहे. आता अंजली दमानिया तसंच राजकीय विरोधकांचा पुढचा टप्पा धनंजय मुंडेंचं मंत्रीपद असल्याचे संकेत स्पष्ट दिसत आहेत. या प्रकरणात उद्या कोणते सीसीटीव्ही फुटेज समोर येणार, कोणते नवे आरोप केले जाणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

### धनंजय मुंडेची आमदारकी...

पद्धतीने आपल्या कंपनीसाठी कोणताही फायदा मिळवत असतील तर ते लाभाचे पद या नियमाचे उल्लंघन ठरते. यामुळे धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद सोडा, त्यांचे विधानसभेचे सदस्यत्वही रद्द होऊ शकते. धनंजय मुंडेंच्या जगमित्र शुगर्सला ६२ कोटी रुपयांचे कर्ज कोणत्या आधारावर देण्यात आले? हायकोर्टाने याविषयी एसीबी, ईडी आणि सीआयडीला चौकशी करण्याचा आदेश द्यावा.''

### तब्बल २२ वर्षानंतर...

क्लास घेवून यामध्ये टेन्स शिकवला. तसेच मिसाळ सरांनी दहा मिनिटे हिंदी विषयाचे अध्यापन केले. मोटे मॅडम, अंदुरे मॅडम व शेळके सर यांनी देखील माजी विद्यार्थ्यांप्रती आपले अनुभव कथन केले. यावेळी अनेक माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत वर्गामध्ये सरांच्या प्रश्नांना उत्तरे देणे, त्याबरोबरच आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे खोड्या करणे, आपापसात गप्पा मारणे, वर्गात इकडे तिकडे बघणे इत्यादी गोष्टींमुळे प्रत्यक्ष मिसाळ सरांच्या हातातील छडीने खोटा–खोटा मार देखील खाल्ला. यावेळी वर्गामध्ये संतोष सोनवणेच्या 'सर हा बघा ना मला चिमटा घेतो' या डायलॉगने वर्गात एकच हाश्या पिकला. अशा अनेक गमती–जमती अनुभवत सर्व विद्यार्थ्यांनी या वर्गातील हा वेळ अतिशय अविस्मरणीय पद्धतीने अनुभवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक अभय पटवारी सर व टेकाळे सर यांनी उत्कृष्ट पद्धतीने सांभाळले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे माजी विद्यार्थी प्रा. कृष्णा खांडे व विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून मनीषा राऊत यांनी केले.तसेच विद्यार्थी मनोगतामध्ये डॉ.गणेश काकडे, दैवशाला सातपुते, अंगद महाराज शिर्के, संतोष फफाळ, सुनील पाटोळे, सुग्रीव राजगुरे, हरिदास

पान १ वरून

कदम, इत्यादी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.शाळेच्या शिक्षकांपैकी, घोडके सर, मिसाळ सर, बागडे सर, गव्हाणे सर, इत्यादी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले व आपल्या बॅचचे कौतुक केले. शेवटी सर्व माजी विद्यार्थी सर्व शिक्षक यांचा ग्रुप फोटो घेण्यात आला व शेवटी शाळेतील दिवंगत शिक्षक व काही दिवंगत माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली घेण्यात आली व कार्यक्रमाचा समारोप झाला.

### वाल्मिकला जेलमध्ये...

करणारे पोलीस कर्मचारी हे वादग्रस्त आहेत. एक कर्मचारी पंधरा वर्षापासून परळीतच कार्यरत आहेत. लवकरच यासंदर्भात मी राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची भेट घेऊन परळी पॅटर्न त्यांच्या उलगडगून सांगणार आहे, असे सुरेश धस म्हणाले. परळीत पोलीस कर्मचाऱ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत सगळे आकाने निवडले आहेत. त्यामुळे गुन्हे विभागाला हे प्रकरण देण्याची मागणी मी केली आहे. मुंडे यांच्या कुटुंबाने देखील हीच मागणी केली आहे. माझ्याकडे जी माहिती आली, त्या आधारावर पोलीस कर्मचाऱ्यांची नावे यात येत आहेत. विष्णू फड, भास्कर केंद्रे यांचे कॉल डिटेल्स चेक करावे. जेणेकरून मारेकरी समोर येतील, असे सुरेश धस म्हणाले.

### बिंदुसरा नदीपात्रात...

झाले की काय ? अशी शंका निर्माण होत आहे. मोंढा रस्त्यालगत जुन्या हिंदू स्मशानभूमीच्या पाठीमागे बिंदुसरा नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असून अनाधिकृत बांधकाम करण्यात येत आहे. हे करत असताना शेकडो वर्ष जुने महाकाय वृक्षांची राजरोसपणे कत्तल केली जात आहे .प्रथम नदीपात्रात भर टाकायची त्या ठिकाणी जागा तयार करायची. त्या ठिकाणी छोटेसे धार्मिक स्थळ उभे राहायचे. मग त्यावर प्लॉटिंग टाकून नदीपात्रातील जमिन गिळंकृत करायची असा काहीसा प्रकार दिसून येत आहे. याबद्दल सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी नगरपालिका तसेच जिल्हा प्रशासनाकडे लेखी तक्रारी तसेच आंदोलनाद्वारे कारवाईचे मागणी केलेली आहे. यातच आता वृक्षतोडीमध्ये शेकडो वर्ष जुने तिन चिंचांचे व पाच लिंबांचे महाकाय नदीपात्रातील वृक्ष तोडण्यात आलेले आहेत. भूमाफियांना हे वृक्ष अडचण ठरत असावेत यामुळे हे वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. या सर्व प्रकाराकडे नगरपालिका प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन आणि वनविभाग दुर्लक्ष करत आहे. यामुळे अतिक्रमणधारकांचे मनोधैर्य वाढत असून निसर्गावर, नदीवर घाला घालून बिंदुसरा नदीपात्र गिळंकृत करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. असे प्रकार वाढत राहिल्यास १९८९ सारखी पूरस्थिती येऊन हजारो नागरिकांचे प्राण जाऊ शकतात याला जबाबदार कोण असेल? त्यामुळे प्रशासनाने नदीचे सीमारेषा आखून देणे. भुमाफियांनी केलेले अतिक्रमण काढून टाकणे. ज्यांनी वृक्षतोड केली आहे त्यांच्यावर कठोर करावी शासन स्तरावरून करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसा पर्यावरण प्रेमी यांनी केले असून भविष्यात मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

### पत्रकार संघाच्या...

असताना वैभव स्वामी यांनी विविध उपक्रमशील उपक्रम राबवून पत्रकार

पान १ वरून

संघाचे नाव उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्याचबरोबर संघटन कौशल्य वापरून पत्रकार संघाचे सभासद, पदाधिकारी जोडण्याचे काम मराठवाडास्तरावर प्रामुख्याने केले. यामुळे त्यांना पत्रकार संघाने त्यांना राज्यस्तरीय उपक्रमशील अध्यक्ष म्हणून तीन वेळा राज्यस्तरीय मेळाव्यामध्ये पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊनच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संघटक मा. श्री संजय भोकरे साहेब यांच्या आदेशानुसार पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारिणीने पत्रकार संघाचे ध्येयधोरण आणि संघटना वाढीसाठी ग्रामीण व शहरी पत्रकारांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी त्यांच्यावर प्रदेश संपर्कप्रमुख या राज्यस्तरावरील मानाच्या आणि सन्मानाच्या पदावर संधी दिल्याने त्यांचे मराठवाड्यासह राज्यस्तरातून अभिनंदन होत आहे.

### राजेभाऊ फड यांची...

मागण्यांची तत्काळ दखल घेण्यात यावी याविषयी राजेभाऊ फड यांनी सूचना केल्यानंतर विजय बडे आणि त्यांचे सहकारी यांना लेखी आश्वासन देण्यात आले. दिलेल्या लेखी पत्रात समाधानकारक उत्तर मिळाल्याने त्यांनी अमरण उपोषण मागे घेतले. याविषयी अधिक असे की, तालुक्यातील मौजे रेवली येथील उपोषणकर्ते विजय बडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी मागील पाच दिवसांपासून उपोषण सुरू केले होते. यात प्रामुख्याने भ्रष्ट व कामचुकार सतत अपमानजनक वागणूक देणाऱ्या ग्रामसेवक यांचे निलंबन करण्यात यावे, पंधरावा वित्त आयोग, ९०१० व २५/१५ अंतर्गत सर्व विकास कामांची चौकशी करून संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, गट ब व गट क अंतर्गत झालेल्या रेवली पाटी ते जिल्हा परिषद शाळा पर्यंत झालेल्या डांबरीकरण रस्त्याची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे या मागण्यांसाठी मागील पाच दिवसांपासून हे उपोषण सुरू होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी पंचायत समिती प्रशासनाला धारेवर धरत उपोषणकर्ते यांची समजूत घातली. तद्नंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तमराव माने, प्रल्हाद गित्ते, भटक्या विमुक्त जाती जमाती सेलचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दत्ताभाऊ चव्हाण, तालुकाध्यक्ष गणेश देवकते, कैलास सोळंके, परळी तालुका संघटक हनुमंत माने, नितीन भैय्या कदम यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### क्रिडा मंत्री दत्तात्रय...

७३८५२४५५४८. सायंकाळी ८.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. रविवार २६ जानेवारी २०२५ सकाळी ९.०० वाजता विश्रामगृह बीड येथून पोलिस मुख्यालय बीडकडे प्रयाण. सकाळी ९.०५ वाजता पोलिस मुख्यालय, बीड येथे आगमन. सकाळी ९.१५ वाजता भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण समारंभास उपस्थिती स्थळ: पोलिस मुख्यालय, बीड सकाळी १० वाजता बीड येथून इंदापूर, जि. पुणेकडे प्रयाण.

### राज्यातील सर्व जिल्हाधिकारी...

व पेपरलेस होत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि

पान १ वरून

आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली देखील विकसित करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली आहे. मा. मुख्यमंत्री कार्यालयातील ''मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा'' कडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना संबंधित रुग्णालयामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. सध्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशिल, सोपी होणार आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक साहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. यामुळे हा उपक्रम केवळ आर्थिक सहाय्याचा स्त्रोत न राहता गरजूंसाठी आशेचा किरण ठरत आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या संवेदनशीलतेमुळे, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना अत्यावश्यक आर्थिक मदत पुरवली जात आहे. या सेवांचा मोठ्या प्रमाणावर लाभ राज्यांतील गरजू रुग्णांना घेता यावा यासाठी राज्यात सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात ''मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांना नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून शासनाच्या इतर योजनेस समाविष्ट असलेले आजार वगळण्यात येणार आहेत. उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## वैष्णवी महाविद्यालया मध्ये मराठी भाषा पंधरवडा निमित्त विविध स्पर्धेचे उद्घाटन




**वडवणी । प्रतिनिधी**

साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैष्णवी महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा पंधराव्या निमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रथम महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे उद्घाटक म्हणून वडवणीचे गटशिक्षणाधिकारी मा.बाबासाहेब उजगरे उपस्थित होते.यावेळी प्रमुख उपस्थित म्हणून संस्थेचे सचिव, डॉ. रणजीत मस्के पाटील हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शामसुंदर गुळभिले होते.यावेळी गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगत दररोज वर्गात उपस्थित राहण्याचे फायदे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास होके ,सुत्रसंचलन डॉ. गणेश शित्रे तर अभार प्रा. मुंजाजी सोंळके यांनी माणले.

# वडवणीत येथे भव्य तपपूर्ती किर्तन महोत्सव : अर्जुन महाराज खाडे

## राज्यातील नामवंत कीर्तनकार प्रवचनकार, गायनाचार्य, मृदंगचार्य यांची लाभणार हाजेरी

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यात मौजे वडवणी येथे भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या दि.२५ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२५ मोठा मारोती मंदिरा मागे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब चौक मैदान वडवणी ता. वडवणी जि. बीड येथे ग्राामस्थांच्या वतीने व ज्ञानेश्वरी प्रवक्ते अर्जुन महाराज खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून सप्ताहाचे यंदा १२ वे वर्ष आहे याची गावकऱ्यांच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्याचे गौरवशाली भूमिपुत्र ज्ञानेश्वरीचे प्रवक्ते व अभ्यासक ह.भ.प.अर्जुन महाराज खाडे हे गेल्या २७ वर्षांपासून महाराष्ट्राच्या विविध भागात तसेच गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश या राज्यात देखील खाडे महाराज यांच्या ज्ञानेश्वरी भावकथा सादर झालेल्या असून त्याला भाविक भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला आहे. जीवन कसे जगावे हे ज्ञानेश्वरी शिकवते आणि महाराजांच्या रसाळ वाणीतून ज्ञानेश्वरी भावकथा ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध होतात. या भावकथेमुळे ग्रामीण भागातील अनेक गावात परिवर्तन झाले असून गावचे गावे व्यसनमुक्त, मांसाहार मुक्तझालेले आहेत. समाज परिवर्तनाचा इतिहास या ज्ञानेश्वरी भावकथा सोहळ्यातून घडत आहे. अर्जुन महाराज खाडे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत अपार कष्ट व तपश्चर्येतुन ज्ञानेश्वरी भावकथा सोहळा सुरु केलेला आहे. आपल्या रसाळवाणीतून ते श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतात. आजच्या धावपळीच्या युगात माणूस भौतिक सुखाच्या मागे धावत आहेत. सततच्या पैशाच्या हव्यासाने आपण कोण आहोत, आपण कसे जगावे है विसरून गेला आहे, त्यामुळे प्रत्येकजण मन:शांती व जीवन जगण्याचा मंत्र फक्त हरिपाठातच मिळतो. त्यामुळे प्रत्येकोनी दररोज सार्थ हरिपाठ वाचलाच । पोहिजे. यासाठी जीवनमंत्र देण्याचे काम खाडे महाराज करत आहेत. त्यांनी आज पर्यंत लाखो लोकांत परिवर्तनाची लाट पोहचवली आहे. त्यांचे कार्य कोणत्याही अडचणींची तमा न बाळगता अखंडपणे सुरु आहे. तसेच या महोत्सवात रात्री



०८:०० ते १०:०० या वेळेत दररोज महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकारांची किर्तने ऐकण्याचे भाग्य श्रोत्यांना लाभणार आहे. तसेच सप्ताहामध्ये व्यासपीठ चालकः- ह.भ.प.सौ. गीता ताई महाराज खाडे (भांगे), यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण होणार आहे. गायकः- संगीतविशारदः श्री. यशवंत महाराज खामकर, श्री. रमेश महाराज गिरे

मृदुंगाचार्यः- मृदुंगविशारद श्री खंडू महाराज सानप साथसंगत करणार आहेत. याचा सर्व श्रोत्यांनी आवर्जून लाभ घ्यावा अशी विनंती वडवणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

### या महाराजांचे होणार किर्तन

**शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ ह.भ.प. श्री रामचंद्र महाराज निकम, रविवार दि. २६ जानेवारी २०२५ ह.भ.प. श्री शिवा महाराज भास्कर, सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ ह.भ.प. श्री विशाल महाराज खोले, मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ ह.भ.प. श्री बाळकृष्ण महाराज वसंतगडकर, बुधवार दि. २९ जानेवारी २०२५ ह.भ.प. श्री पुरुषोत्तम महाराज पाटील, बुलढाणा, गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ ह.भ.प. श्री पारस महाराज मुथा, शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ ह. भ. प. श्री पांडुरंग महाराज सोळुंके, शनिवार दि. १ फेब्रुवारी ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प. श्री अर्जुन महाराज खाडे, रविवार दि २ फेब्रुवारी २०२५ ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प. श्री अर्जुन महाराज खाडे यांची सकाळी १० ते १२ काल्याच्या किर्तनाची सेवा होणार आहे. त्या नंतर कै. विश्वासराव नाथराव आसलकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या परिवाराकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.**

## जिल्ह्यात चौदा हजार दोनशे जात वैधता प्रमाणपत्र वितरित

### इमाव विद्यार्थ्यांसह विविध लाभार्थ्यांना दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसह विविध लाभार्थ्यांना जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचेमार्फ़त एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ अखेर तब्बल १४२०० वैधता प्रमाणपत्र निकाली काढण्यात आले. जिल्ह्यातील अनु. जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग व एस. ई.बी.सी. प्रवर्गासाठी शैक्षणिक कामासह सरकारी कामांमध्ये, शासकीय योजनांकरता जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते. वैधता प्रमाणपत्रासाठी लागणारी कागदपत्रे व इतर बाबी वेळ खाऊ असतात. मात्र जात पडताळणी समितीमार्फ़त अशा चौदा हजार दोनशे लाभार्थ्यांना वैधता प्रमाणपत्र समितीमार्फ़त वितरित करण्यात आलेले आहेत. लाभार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन व ऑफ़लाईन आलेली कागदपत्रे तपासल्यानंतर त्यामधील त्रुटी असल्यास तसे कळवले जाते. त्यानंतर लाभार्थ्यांनी या त्रुटी पुर्तता केल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रस्तावाला तत्वत: मान्यता देऊन हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी समितीसमोर ठेवला जातो.

## आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना गुंतवणूकदार जागरूकतेचे धडे

### विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी महाविद्यालयाने राबवला उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थी सुशिक्षीत होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही. आर्थिक साक्षरता होणे काळाची अत्यंत गरज आहे.

आपला पैसा कोठे आणि कसा गुंतवायचा, पैसे कसे कमवायचे. आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर तो विद्यार्थी भविष्यात केव्हाच आर्थिक अडचणीत येवू नये यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या




कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) कडून एक दिवशीय गुंतवणूकदार जागरूकता कार्यशाळा घेण्यात आली यावेळी सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे धडे दिले. अलीकडे तरुण वर्गामध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव दिसून येतो. तरुणांचा काळ दिवसेंदिवस चैनी वस्तू, मौजमजा, बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे वळत चालला आहेत. तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक होते. यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे विद्यार्थी दशेमध्ये योग्य ते आर्थिक नियोजन केले तर भविष्यातील येणारे आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात.

## शासकीय, खासगी कार्यालयांमध्ये महिला तक्रार समिती गठित करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार बीड जिल्हयातील सर्वशासकीय व खाजगी क्षेत्रातील ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिक अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश असेल अशा सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी सहकारी महामंडळ इ. आस्थापनांमध्ये तसेच कोणतीही खाजगी संघटना, एन्टरप्राइझेस अशासकीय संघटना, ट्रस्ट, उत्पादक पुरवठा विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औदयोगिक, आरोग्य, वित्त इ. सेवा देणारे युनिट या सर्व ठिकाणी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत कामाच्या ठिकाणी तक्रार निवारण समिती ३१ जानेवारी २०२५ पर्यंत गठीत करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे. समिती गठीत झाल्यानंतर समितीचे अध्यक्ष, सदस्यांची नावे पदनाम व संपर्क क्रमांकाचा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावा. तसेच समिती गठीत केल्याबाबतचे आदेश जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बाबुराव वाघ हाईटस, नाट्यगृह रोड, बीड येथे तात्काळ सादर करावेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये सर्वेक्षण करण्यात येणार असून या सर्वेक्षणावेळी संबंधित आस्थापनेमध्ये सदर अधिनियमांतर्गत तक्रार निवारण समिती गठीत न केल्याचे निदर्शनास आल्यास कायदयानुसार ५० हजार रुपयांपर्यंत दंड करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

## पिंपळनेर जिल्हा परिषद शाळेच्या विज्ञान प्रयोगाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगाव ता.जि. बीड या ठिकाणी आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री जिल्हा परिषद शाळा पिंपळनेर या शाळेने घवघवीत यश संपादन केले .प्राथमिक गटातून या शाळेच्या प्रयोगाने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सदरील प्रयोगाची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. इयत्ता आठवीचा विद्यार्थी आजबे शिवराज विष्णू व शिरसाट प्रवीण आनंद हे विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक जनरेटर या उपकरणासह सहभागी झाले होते. त्यांना विज्ञान शिक्षक श्री. निळकंठ सर व श्री शेलार सर यांनी मार्गदर्शन केले. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन हे दिनांक २८ जानेवारी ते फेब्रुवारी या कालावधीत शिवाजी विद्यालय अमरावती या ठिकाणी संपन्न होणार असून शाळेच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री साळवे सर केंद्रप्रमुख सारडा सर,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गोरख नाना कांडेकर, समितीचे सर्व सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री साळवे सर केंद्रप्रमुख सारडा सर,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गोरख नाना कांडेकर, समितीचे सर्व सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## बीड जिल्ह्याधिकारी यांनी सरपंचपद रद्द आदेशाला माननीय उच्च न्यायालयाने दिली स्थगिती

**बीड । प्रतिनिधी**

२० जानेवारी २०२५ ला बीड जिल्हाधिकारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र वेळत सादर न केल्याने बीड जिल्ह्यातील सात तालुक्यातील १३ सरपंच व ४१८ सदस्याचे सदस्य रद्द केल्यानंतर माजलगाव तालुक्यातील खरात-आडगाव येथील सरपंच श्रीमती अनुसया मधुकर आढाव यांनी सदरील आदेश माननीय उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले आहे तरी माननीय उच्च न्यायालयाने सदरील आदेशाला स्थगिती दिलेली आहे.

प्रस्तुततची हकीगत अशी की, सन २०२२ ग्रामपंचायत खरात आडगाव ता.माजलगाव गावची ग्रामपंचायत निवडणूक ही पार पाडली होती सदरील निवडणुकीमध्ये लोकांमधून निवडून आलेले सरपंच श्रीमती अनुसया मधुकर आढाव या नागरिकांचा मागास प्रवर्ग (महीला) या प्रवर्गातून सरपंच पदी निवडून आल्या आहे.

तसेच निवडणुकीमध्ये त्या नागरिकाच्या मागास प्रवर्गातील असल्याने त्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र हे जुलै २०२३ रोजीच दाखल केलेले आहे. तरीही बीड जिल्हाधिकारी साहेबांनी सदरील महिलेचे सरपंच पद रद्द केले त्यामुळे त्यांनी माननीय मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे ॲड. संदीप रामनाथ आंधळे यांच्या मार्फत दिवाणी याचिका दाखल करून सदरील आदेशाला आव्हान दिले होते.

तरी माननीय न्यायमूर्ती साहेबांनी जुलै १० जुलै २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने अध्यादेश क्रमांक सहा च्या आधारे सदरील जात वैधता प्रमाणपत्र हे दाखल केलेले दिसून येते त्यामुळे सदरील आदेश माननीय न्यायमूर्ती साहेबांनी स्थगिती दिली.

सदरील प्रकरणात याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. संदिप आंधळे यांनी काम पाहिले त्यांना ॲड. सागर मडके यांनी त्यांना सहकार्य केले.

## श्री नारायण विद्यालयामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पुजन केले . प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर होते. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी एका पेक्षा एक असे




उस्फूर्त भाषणे केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक श्री धर्मराज पौळ सर यांनी केले तर सूत्रसंचालन श्री रकटे बी. आर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक अशोक घरत सर यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक श्री मस्के जी.बी,श्री, प्रा. श्री मुरमुडे सर प्रा. रकटे प्रवीण, श्री इनकर सर , श्री चव्हाण वाय. डी,श्री चौधरी पी. बी, श्री एस. ए. करपे, श्री रकटे एन. पी , शेख ए.के, यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आणखी एका बीडकर सुकन्येनं अभिमानास्पद कामगिरी केली: दिल्लीतील राजपथावर परेड कमांण्डर म्हणून निवड

**बीड । प्रतिनिधी**

खो-खो वर्ल्डकपवर कु. प्रियंका इंगळे या बीडकर कन्येनं आपला ठसा उमटविला आहे. आता आणखी एका बीडकर सुकन्येनं सर्वांना अभिमान वाटावा अशी कामगिरी करून बीडचे नाव देशभर रोशन केले आहे.

बीड जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यातील देवडी गावची मुळ रहिवासी असलेली कु.दामिनी दिलीप देशमुख हीची २६ जानेवारी रोजी म्हणजे प्रजासत्ताक दिनी दिल्लीतील राजपथावर होणाऱ्या परेडसाठी परेड कमांण्डर म्हणून निवड झाली आहे. कु.दामिनी एअरफोर्स मध्ये पायलट म्हणून



देशसेवा करीत आहे. परेडसाठी कमांडर म्हणून नेतृत्व करण्याची संधी मिळणे हा बहुमान आहे.. ती संधी कु.दामिनीला मिळाली याचा देशमुख देवडीकर कुटुंबीय आणि तमाम बीड जिल्ह्याला व महाराष्ट्राला नक्कीच अभिमान आहे. कु.दामिनीचे वडिल न्या. दिलीप देशमुख हे पुणे विभागाचे चॅरिटी कमिशनर म्हणून नुकतेच निवृत्त झाले आहेत. कु.दामिनी ही अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांची पुतणी आहे. खरंच कु.दामिनी चा आम्हा बीड करांना सार्थ अभिमान आहे. बीड करांच्या वतीने डोंगरचा राजा च्या माध्यमातून कु.दामिनीचे मनापासून अभिनंदन. काहींनी बीडचे नाव देशभर बदनाम केले आहे. मात्र बदनामीचा हा शिक्का पुसून काढण्यासाठी बीडची युवाशक्ती पुढे येत आहे हे पाहून निश्चित सर्वांना आनंद होत आहे. बीड मध्ये अनेक सकारात्मक गोष्टी घडत असतात. मात्र त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. नकारात्मक बातम्यांना जास्त प्रसिध्दी मिळते. अशा वातावरणात कु.प्रियंका असेल किंवा कु. दामिनी यांचं कर्तृत्व अधिक उठून दिसते. बीड जिल्हा केवळ ऊस तोडणी कामगारांचा जिल्हा नाही तर कर्तृत्ववान युवकांचाही जिल्हा आहे. ही नवी ओळख आता निर्माण होत आहे.याचा निश्चितच आपल्या सर्वांना आनंद आहे.बीड जिल्हा हा विविध संघटनेच्या, विविध खेळांच्या आणि वेगवेगळ्या विधायक कार्याच्या बाबतीत महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. जेंव्हा एखाद्या घटनेचे पडसाद महाराष्ट्रभर पडतात. बीड जिल्ह्यातला अतिमागास म्हणून गणाला जात असलेला तालुका म्हणजे वडवणी तालुका या तालुक्यातील छोट्याशा देवडी गावची मुळ रहिवासी असलेली कु. दामिनी दिलीप देशमुख ही कन्या फ्लाइंग ऑफिसर म्हणून देशाच्या वायुदलात अतिउच्चपदी विराजमान झालेली आहे. बीड जिल्ह्यातील महिला मुली राजकिय, सामाजिक ,वैद्यकिय अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. कु.दामिनी देशमुख या मुलीने एका नविन क्षेत्रात पदार्पण करून बीड जिल्ह्याचे नाव उज्वल करून आपल्या कर्तुत्वाची मुद्रा ,पताका फडकवण्याचे अभिनव कार्य याच दामिनीने केलेलं आहे. व करत आहे. दामिनीने जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर सन २०१९ मध्ये देशपातळीवर घेण्यात आलेल्या कॉमन अडमीस्ट्रेट या खडतर परीक्षेत देशभरातील दिड लाख उमेदवारामधून गुणवत्ता यादीमध्ये येत अभिनव व दैदिप्यमान यश संपादन करून तिची एअर फोर्समध्ये फ्लाईंग ऑफिसर म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे या दामिनीने आपल्या आवडत्या क्षेत्रात करीअर करण्यासाठी शासनाची मीळत असलेल्या उच्च शिक्षणासाठीची शिष्यवृत्तीही सोडून दिली.

## गळीतधान्य अंतर्गत महाडीबीटी वर सिंचन साधने मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत

**बीड । प्रतिनिधी**

२०२४-२५ अन्न आणि पोषण सुरक्षा-कडधान्य, भात व गहू तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- गळीतधान्य अंतर्गत महाडीबीटी वर सिंचन साधने (पाईप व पंप) या घटकांचे लक्षांक भरण्यात आले आहेत. तसेच कडधान्य मध्ये बीज प्रक्रिया ड्रम, पौष्टिक तृणधान्य अंतर्गत ींश्रींशीळीशी व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-गळीतधान्य अंतर्गत मनुष्यचलित टोकन यंत्र मनुष्यचलित सायकलवर चालणारे सिड ड्रील, छोटे तेल घाणा सयंत्र या घटकांचे लक्षांक भरण्यात आले आहेत.

सदर बाबींसाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर सदर बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. चशलहरपळूरींळेप व खीींळसरींळेप या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. अर्ज करण्याची शेवटची तारीख २८ जानेवारी, २०२५ असेल. तरी, जास्तीत जास्त शेतक-यांनी ारहरवलीं.ारहरीरिहीीर.सीं.ळप षरीाशी श्रेसळप या वेबसाईट वर जाऊन ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विभागीय कृषी सहसंचालक / जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी / उप विभागीय कृषी अधिकारी / तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# राज्य क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह निमित्ताने विविध क्षेत्रातील नागरिक, विद्यार्थ्याचा गौरव

## शहरी व ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजवण्यास मदत होते डॉ. सुधाकर चिंचाणे

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा दिन व सप्ताह आयोजनाने शहरी भागासह ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजण्यास मदत होते असे प्रतिपादन जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाने यांनी केले.

राज्य शासनाद्वारे १५ जानेवारी हा दिवस ऑलिंपीकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येत आहे.

दिवंगत खाशाबा जाधव, गोळेश्वर, कराड जिल्हा सातारा यांनी ऑलिम्पीक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी १९५२ मध्ये पहिले वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्ती क्रीडा प्रकारात पहिले पदक (कास्य) पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृती जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्हयात दर वर्षी क्रीडा सप्ताह साजरा करण्यात येतो. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यामाने बीड जिल्हयात विविध ठिकाणी दि. १५ जानेवारी २०२५ ऑलंपीक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन व दि. १५ जानेवारी ते २१ जानेवारी हा क्रीडा सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रसंगी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करतांना खेळाडू विद्यार्थ्यांनी सदर उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. राज्य क्रीडा दिनाचे व क्रीडा सप्ताहच्या आयोजनामुळे शहरी व ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजवण्यास मदत होती. प्रतिपादन जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे यांनी केले.

राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधुन व क्रीडा क्रीडा सप्ताहाच्या क्रीडा सप्ताहाच्या समारोप प्रसंगी बीड जिल्हयातील सन २०२४-२५ या वर्षात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या व सप्ताहा अंतर्गत विविध स्पर्धा व उपक्रमात सहभाग घेवून प्राविण्य मिळविलेले खेळाडूंचा दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी क्रीडा संकुल हॉल, बीड येथे जिल्हा नियोजन अधिकारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व चषक ( ट्रॉफी ) देवून गौरव करण्यात आला. सदर प्रसंगी दिव्य दै. दिव्य मराठी जिल्हा प्रतिनिधी दिनेश लिंबेकर, शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी जेष्ठ क्रीडा संघट प्रा. जे.पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरंविद विद्यागर, सेवा निवृत्ती क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, प्रा. भागचंद्र सानप, डॉ. अविनाश बारगजे, प्रा. गोपाल धांडे, प्रा. दिनकर थोरात, डॉ. कविता कराड, विनायक वझे, तत्वशिल कांबळे, क्षितीजा गव्हाणे रामदास गिरी, अफरोज शेख, सुनील वाघमारे, आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्तावित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले तर आभार क्रीडा अधिकारी अनिकेत काळे यांनी मांडले राज्य क्रीडा दिन निमित्ताने बीड जिल्हयातील सन २०२४-२५ वर्षामध्ये पुढील राष्ट्रीय खेळाडूंचा नयन बारगजे, चौरे रत्नमाला, चौरे पंकजा, काळे राम, मुंडे ओंकार, आंधळे तनुजा, तिडके पुजा, यश जाधव, सुरज येवले, ओंकार मोरे, आकाश खांडे, आर्यन येळवे, आदित्य तांदळे, वेदांत डावकर, वृषभ शिंदे, सार्थक पवार, नंदिनी मुळुक, समुध्दी काळकुटे, साक्षी ताटकर, अक्षरा चोले, शिवम कापसे, शिवराज कांतुले, स्नेहल शिंदे, अक्षरा पवार, मोहम्मद आदेक, ओमकार परदेशी, सार्थक भाकरे, कार्तिकी मिसाळ, यशस्वी चव्हाण, धवन तांबारे, मोहमद अली, आदिती लोंढे यांच्यासह क्रीडा सप्ताह निमित्ताने आयोजित विविध स्पर्धेत सहभाग घेवून प्राविण्य मिळविलेले खेळाडू, यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यातआला.

## आनंदनगरीची धमाल, सुवासिनींचा मेळा पालक व विद्यार्थ्यांनी गजबजली शाळा: दिंद्रुडच्या जि.प.शाळेचा अभिनव उपक्रम

**दिंद्रुड । प्रतिनिधीं**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या- मुलांची) शाळेतील प्रांगणात आनंदनगरीची धमाल अनुभवायला मिळाली. तर हळदीकुंकवाच्या निमित्ताने सुवासिनींचा मेळा भरल्याने शाळा अक्षरशः गजबजून गेली होती. मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल मांडून आनंद साजरा केला तर गावातील सुवासिनींनी एकमेकींना तिळगूळ वाटत हळदीकुंकवासह वह्या व पेनांचे वाण वाटले. सदरील अभिनव उपक्रम गुरुवार रोजी पार पडला. राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा



पूजनाने या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी सरपंच अजय कोमटवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार प्रकाश काशीद, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर, केंद्रीय मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे, मंचक सोळंके, मनोहर कटारे, शालेय समिती अध्यक्ष दादासाहेब वकरे, उपाध्यक्ष अंगद तांबे, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, पत्रकार गणेश काटकर, युवानेते बाबा कांबळे आदिंची उपस्थिती होती. शाळेतील पहिली ते सातवीच्या मुला-मुलींनी ६९ दुकाने थाटली होती. ज्यात ५५ हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली.

## सामाजिक समरसतेची जाण असणाऱ्या शांताई अर्बन मध्ये मकर संक्रांतनिमित्त हळदी कुंकू कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

सामजिक सलोखा जपण्यासाठी शांताई अर्बन मध्ये अनेक उपक्रम केलें जातात म्हणून मकर संक्रांत हळदी कुंकाचे ओचीत्य साधून शेतकरी देखावा करण्याचा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. बदलत्या जीवनशैलीमुळे रोजच्या आहारामध्ये शेती पूरक पदार्थाची मागणी वाढली आहे परंतु शेतकऱ्यांना जसा पाहिजे तसा मोबदला मिळत नाहीये सुशिक्षित नवतरुण शेतीतून आपली पाठ फिरवत आहे. ग्रामीण भागात थांबण्याची तरुणांची मानसिकता दिसत नाहीये




खरोखर शेतकरी जीवन किती कठीण आहे याचा देखावा करण्याचां प्रयत्न शांताई अर्बनने केला . पण नुसता प्रयत्न न करता संस्थेचे अध्यक्ष डॉ.डी. बी.शिंदे सर यांनी शेतकऱ्यासाठी काही योजना या संक्रांती पासुन सुरु केल्या आहेत तसेच शांताई अर्बन बँकेच्या सर्व खातेदारांनी शेतकऱ्याकडून च दैंनदिन वस्तू घ्याव्यात असे आव्हान या उपक्रमतून केलें शेतकरी हा राजा आहे आणि राजाचा विकास होणे आवश्यक आहे हे यातून दाखवण्याचा प्रयत्न शांताई अर्बन ने केला, हा देखावा यशस्वी करण्यासाठी खऱ्या अर्थाने शाखेतील सर्व कर्मचारी वर्गांचे व संचालक मंडळाचे त्याच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## कोपण दुकान अंतर्गत येणाऱ्या कार्ड धारकानीं ३१ मार्च पर्यंत ई केवायसी करून घ्या : विशाल इंगोले

**बीड । प्रतिनिधी**

ज्या कार्ड धारक यांना प्रधान मंत्री कुटुंब कल्याण योजणे अंतर्गत ५ वर्षासाठी मोफत धान्य मिळत आहे अशा कार्ड धारक यांनी आपल्या नजिकच्या स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कडे जाऊन आपल्या कोपण कार्ड वर ऑनलाईन नोंदणी असलेल्या सर्व सदस्य यांची केवायसी करून घेणे बंधनकारक आहे.

जे कार्ड धारक केवायसी करून घेणार नाही अशांची नावे ऑनलाईन शासनाच्या वतीने वगळले जातील तसेच ज्याची केवायसी होणार नाही अशांना दवाखान्यात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ सुध्दा घेता ऐणार नाही त्यामुळे आपल्या कुटुंबातील सर्व सदस्य ज्यांचे वय ५ वर्षांच्या पुढे आहेत अशांची तातडीने केवायसी करून घेणे व केवायसी करतांना जर अडचण येत असेल तर ज्यांचे आधार कार्ड अपडेट नाही अशांचे आधार कार्ड अपडेट करून घ्यावे ज्याने करून ५ वर्ष वय असलेले व जेष्ठ नागरिक यांचे आय स्केनर ने डोळे स्कॉन करून ई केवायसी होते त्यामुळे सर्व नागरिकांनी ३१ मार्च च्या आत होईल तेवढ्या कुटुंबातील सदस्य यांची ई केवायसी करून घेणे असे आवाहन अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे बीड तालुका अध्यक्ष विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## दिंद्रुड च्या केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन च्या वतीने रक्तदान शिबिर संपन्न




### ५० रक्तदात्यांनी केले रक्तदान

**दिंद्रुड । प्रतिनिधीं**

सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे, अत्यावश्यक बाबीत रक्ताची नितांत गरज असताना रुग्णांना तात्काळ रक्त मिळावे यासाठी बीड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिष्ट असोसिएशनच्या सदस्यांनी गाव पातळीवर रक्तदान शिबिराचे आयोजन शुक्रवारी केले होते, दिंद्रुड येथील ५० रक्तदात्यांनी येथे पार पडलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करीत सामाजिक सेवेचा वसा जोपासला.

ऑल इंडिया केमिस्ट ॲणंड ड्रगिष्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी देशभरात असोसिएशनच्या वतीने विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. बीड जिल्ह्यातील अनेक गावात या शिबिराच्या आयोजनाखाली शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान करीत सामाजिक सेवा बजावली.

दिंद्रुड येथील श्रेया मेडिकल, मातोश्री मेडिकल, ऋषिकेश मेडिकल, यशवंत मेडिकल, रेनगडे मेडिकल ,शिफा मेडिकल,अंबिका मेडिकल व प्रफुल्ल मेडिकल या केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचा सदस्यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. बीड येथील वैद्यकीय टीम रक्तसंचय करण्यासाठी दिंद्रुड येथे शुक्रवारी सकाळी दाखल झाली होती. रक्तदान केल्यानंतर रक्तदात्यांना फळे व नाश्त्याची सोय येथील मेडिकल असोसिएशनच्या वतीने करण्यात आली होती.

## आठव्या आर्थिक गणनेसाठी राज्यात हालचाली सुरु

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनातर्फे राष्ट्रव्यापी आठवी आर्थिक गणना सन २०२५-२०२६ घेण्यात येणार असून सदर गएनेमध्ये आर्थिक कार्यात गुतंलेल्या सर्व उद्योग, व्यवसाय आणि सेवा यांची गणना प्रत्यक्ष घरोघरी, कुटुंबास, उद्योगास भेटी देऊन करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष अविनाश पाठक यांनी कळविले आहे. राज्याच्या भोगोलिक सीमांतर्गत कुटुंबाच्या सीमांतर्गत निवासी जागेत, कुटुंबाच्या निवासाबाहेर संरचना असलेल्या, घरगुती उपक्रम, सार्वजनिक व खाजगी घेणे हा आर्थिक गणनेचा प्रमुख उद्देश आहे.आर्थिक गणनेव्दारे उपलब्ध होणारी माहिती राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय उत्पन्न व राज्य स्मरावरुन राज्य उत्पन्न यासंदर्भातील अंदाज तसेच राष्ट्रीय व्यावसाय नोंदणी अचूकपणे तयार करण्यासाठी उपयुक्त होणार आहे. सदर माहिती जिल्हा व राज्यस्तरावर सामाजिक व आर्थिक व्यवस्थापन तसेच नियोजन यासाठी उपयोगी येणार आहे सदर गणनेच्या कालबध्द अंमलबजावणीसाठी क्षेत्राकामाचे प्रभावी सनियंत्रण व समन्वयासाठी विविध स्तरावर समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

## बालगृहात दाखल झालेल्या मुलींना ३० दिवसात घेऊन जाण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

पुढीलप्रमाणे मुली बालगृहात दाखल झालेल्या असून वृत्त प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसात मुलींना घेऊन गेले नाही तर तर कोणताही हक्क अथवा दावा बालकल्याण समिती बीड ग्राह्य धरणार नाही असे आवाहन बाल कल्यण समिती बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

कु.आरती,वय.०९ वर्षे ०२ महिने ही रंगाने सावळी असून चेहरा गोलाकार आहे, व उंची १२४.ला आहे.ती शरीराने सडपातळ आहे. तिला मा. बालकल्याण समिती बीड,यांच्या आदेशान्वये दिनांक ०६/०४/२०२१ रोजी शंतिवन मुलींचे बालगृह,आर्वी,ता.शिरूर कासार जि. बीड येथे दाखल करण्यात आले आहे.बालिकेस दाखल केल्यापासून कोणीही आई वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही.

कु.सिद्दी संगीता ओहळ वय.१५ वर्षे ०१ महिने ही रंगाने सावळी असून चेहरा लंबगोलाकार आहे, व उंची १४५.ला आहे. ती शरीराने सडपातळ आहे. तिला मा.बालकल्याण समिती बीड,यांच्या आदेशान्वये दिनांक २८/१०/२०२१ रोजी शंतिवन मुलींचे बालगृह, आर्वी, ता.शिरूर कासार जि. बीड येथे दाखल करण्यात आले आहे.बालिकेस दाखल झाल्यापासून कोणीही आई वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही. बालिकांवरात हक्क दाखवणारे माता पिता, पालक व इतर नातेवाईक यांनी खालील पत्ता व दिलेल्या संपर्क क्रमांकावर बातमी प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत संपर्क साधावा हि विनंती. अन्यथा मा.बालकल्याण समिती बालिकांबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल.संपर्क साधावा बालकाचा फोटो व बातमी प्रसारीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी,बीड, मा.बालकल्याण समिती, बीड, शांतीवन मुलींचे बालगृह, आर्वी, जि. बीड. तसेच संस्थेच्या पत्यावर अथवा अधीक्षक- मो. क्र.९९२३७७२६९४, ९४२१२८२३५९ फोनवर संपर्क करावा अन्यथा बालकल्याण समिती बालकाबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल.

## पीएम श्री.जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पालीचा राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

२१ व्या राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत बीड शहराच्या जवळ असलेल्या पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली या शाळेने ग्रामीण भागातील शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ,कष्टकरी सामान्य व वंचित घटकातील मुलांना नाटकाचे प्रशिक्षण देऊन सावली नावाचे धमाकेदार बालनाट्य सादर केले.या नाटकाचे निर्माता मुख्याध्यापक श्रीयुत कांतीलाल लाड ,दिग्दर्शक मनीषा मुंडे,सहमार्गदर्शक मनीषा



खाडे ,नेपथ्य राजेंद्र राठोड ,संगीत गोविंद तळेकर ,केशभूषा वैजनाथ पायके ,रंगभूषा राजेश आघाव,व्यासपीठ रचना संजीवनी काबदे ,मेक अप आर्टिस्ट रेखा सवई यांच्या मार्गदर्शनाखाली बालकलाकार अबोली वाघमारे ,यशराज राऊत ,राजवी तावरे ,अपूर्वा वीर ,श्रावणी नवले ,श्रावणी शिंदे ,अमृता राऊत ,अनन्या माळी ,स्नेहल नवले ,कण्हेय्या जाधव ,प्रसाद नवले ,आदित्य तावरे ,श्रेया वाघमारे,रोहिणी सापते,पूजा खरात ,अक्षरा गायकवाड, वैष्णवी नवले व प्रणित येवले या बालकलाकारांनी अत्यंत बहारदार भूमिका निभावली. सर्वसामान्य ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांना कलागुणांना वाव मिळावा म्हणून आहे त्या परिस्थितीत कलागुण जोपासले पाहिजेत ,कष्ट करून काम करणारी मुले ,हॉटेलमध्ये काम करणारी मुले ,घरकाम करणारी मुले व चोर्या करून ,बूट पॉलिश करून शिकणारी मुले यांचे हुबेहूब पात्र रंगवून शाळा शिकणार्या व एका वडाच्या झाडाखाली भरणारी शाळा सावली नाटकून मुलांनी रंगवली आहे.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आनंदनगरी व हळदी कुंकू हा कार्यक्रम साजरा

**बीड । प्रतिनिधी**

श्री श्री रवी शंकर विद्यामंदिर येथे मंगळवार रोजी शाळेमध्ये हळदी कुंकू आणि आनंदनगरी या दोन्ही कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या,उप मुख्याध्यापिका आणि सर्व महिला च्या हस्ते रिबीन कट करून झाली. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख आकर्षण आपल्या पारंपारिक लोककलेचा देखावा होता यामध्ये




तुळशीची पुजा करणारी महिला ,वासुदेव, पोतराज ,पंढरीच्या वारीचे वारकरी, गोंधळी, लावणी ,विठ्ठल रुक्मिणी सर्व संत मंडळी इत्यादींचा समावेश होता. या देखाव्यामुळे सर्वांना आपली लोककला काय आहे हे समजले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी खाण्याच्या पदार्थांचे स्टॉल लावले होते यामध्ये पाणीपुरी, शेंगदाणे फुटाणे ,लेमन गोळ्या ,गाजराचा हलवा , केक, , पावभाजी, वडापाव ,वेफर्स ,उडीद वडे इडली सांबर, जिलेबी भजी ,वेगवेगळ्या प्रकारचे ड्रिंक्स, कोल्ड कॉफी इत्यादी प्रकारचे पदार्थ विद्यार्थ्यांनी ठेवले होते. हा सर्व कार्यक्रम पाहण्यासाठी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यामध्ये सर्व खाद्यपदार्थाचा आस्वाद सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी घेतला. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अमृता देशपांडे आणि अपूर्वा जोशी या दोघींनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर , श्रीमती स्नेहा पारगावकर , सचिव पाशा सर, मुख्याध्यापक हंसे सर, उपमुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद आणि मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. अशा रीतीने हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांचे विशेष सहकार्य लाभले.

